# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

(नॅकद्वारे **A+**दर्जा)

**विद्यार्थी विकास**


संचालक (का.) : २४०३१३२
विद्यार्थी विकास : २४०३१३३
फॅक्स : (०२४०)२४०३१३४, २४०३१५०
तार : **बामुसिटी**
Web Site : www.bamu.ac.in
E-Mail : **dsw@bamu.ac.in**

**डॉ. कैलास अंभुरे**
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४
**(महाराष्ट्र)**
**मो. क्र. :** ७५८८१६५२२१


संदर्भ /संविवि/२०२६/६४३०-६४८० दिनांक : १६.०७.२०२६

प्रति,
**मा. विभागप्रमुख**
सर्व शैक्षणिक विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषय :** कै. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा आणि शिका) योजनेकरिता पदव्युत्तर पदवी / पदवी / पीएच.डी. च्या विद्यार्थ्यांची निवड करुन यादी व फॉर्म पाठविणेबाबत..

**महोदय/महोदया,**

**उपरोक्त विषयी आपणास कळाविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी आपल्या विभागातील** पदव्युत्तर पदवी / पदवीच्या प्रत्येक वर्षातील व पीएच.डी. मध्ये प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या 'कमवा आणि शिका' योजनेत सहभागी व्हायचे आहे अशा विद्यार्थ्यांची यादी आपल्या विभागातील **समितीकडून मुलाखतीव्दारेच निवड करुनच** फक्त निवडलेल्या विद्यार्थ्यांची नावे संचालक विद्यार्थी विकास याच्याकडे दि. **१० ऑगस्ट २०२६ पर्यंत** पाठवावित. यानंतर आलेले फॉर्म स्वीकारले जाणार नाही.

**याकरिता नियम :**

१. सदरील विद्यार्थ्यांची निवड करतांना गरीब, होतकरु, एकलपाल्य, आई-वडील नसलेले, अल्पभुधारक, गरजू आणि गुणवत्ताधारक अशा विद्यार्थ्यांचा प्राधान्याने विचार करावा.
२. विद्यार्थ्यांची निवड करतांना शासनाच्या आरक्षण धोरणाचे नियम लक्षात घ्यावे.
३. पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या प्रथम व व्दितीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थी संख्येच्या केवळ १०% विद्यार्थी निवडावेत आणि निवड झालेल्या १०% विद्यार्थीची यादी व फॉर्म 'कमवा आणि शिका' योजनेकडे पाठवावे.
४. ज्या विभागात पदवी अभ्यासक्रम आहे तेथील प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या केवळ १०% विद्यार्थीचीच मुलाखतीव्दारे निवड करावी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे १० % विद्यार्थी स्वतंत्रपणे निवडावेत.
५. विभागातील मार्गदर्शकाकडे संशोधन करणारे पीएच.डी. चे केवळ संशोधक विद्यार्थी ज्यांना कोणत्याही प्रकारची फेलोशिप नाही, अशाच विद्यार्थ्यांची निवड करावी.
६. पीएच.डी. च्या ज्या विद्यार्थ्यांनी या योजनेचा यापूर्वी दोन वर्ष लाभ घेतला आहे, अशा विद्यार्थ्यांची निवड करु नये व त्यांची नावे पाठवू नयेत.

७. विभाग प्रमुखांनी पत्रात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये विभागातील प्रथम, व्दितीय वा अन्य वर्गातील प्रवेशित एकूण विद्यार्थी संख्येचा स्पष्ट उल्लेख करावा.
८. विभागातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची निवड ही विभागातील समितीव्दारे झालेली असल्याचे विभागप्रमुख यांनी प्रमाणित करावे. यादीवर समिती सदस्यांची स्वाक्षरी असावी.

**सोबतची सूचना सूचनाफलकावर लावावी.**

विद्यार्थ्यांना ऑनलाईन फॉर्म भरण्याकरिता खाली दिलेल्या लिंकचा वापर करावा.

**https://www.bamu.ac.in/en/student-development/**

खालील दिलेल्या तक्त्याप्रमाणे विद्यार्थ्यांची यादी पाठवावी.

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नाव | प्रवर्ग | दिव्यांगाचा प्रकार | वडील आहेत/नाही | श्रेणी | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|

**संचालक,**
विद्यार्थी विकास मंडळ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

## कै. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा आणि शिका) योजना

दिनांक : १६.०७.२०२६

## सूचना

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता कै. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण (कमवा आणि शिका) योजनेमध्ये सहभागी होऊ इच्छीणाऱ्या पदव्युत्तर प्रथम व व्दितीय वर्ष तसेच पदवी प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षाच्या आणि पीएच.डी. च्या सर्व विद्यार्थी / विद्यार्थीनींना सुचित करण्यात येते की, विभागाव्दारे ज्या विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे अशा विद्यार्थी / विद्यार्थीनींनी **दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १२.०० ते ३.०० वाजता** या वेळेत **विद्यार्थी विकास विभाग** येथे मुलाखतीसाठी हजर रहावे.

'कमवा आणि शिका' योजनेचा फॉर्म विद्यार्थी विकास मंडळाच्या होम पेजवर त्याची सत्य प्रत आपल्या विभागामध्ये जमा करण्यात यावी व फॉर्म चे शुल्क रु. १०/- ची पावती सोबत जोडावी. वेळेवर फॉर्म घेऊन आलेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या जाणार नाही. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म व शुल्क भरण्याकरिता खाली दिलेल्या लिंक किंवा क्युआर कोडचा वापर करावा वापर करावा.

**https://www.bamu.ac.in/en/student-development/**

शुल्क १०/-

फॉर्म

**संचालक,**
विद्यार्थी विकास मंडळ